स्थायी समितीच्या **गुरुवार** दिनांक **13–02–2014** रोजी दुपारी **03–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | **सभापती** |
| 2. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 5. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 6. | सौ. विषया विकास खोब्रागडे | सदस्या |
| 7. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 10. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 11. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 12. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 13. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 2. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |
| 3. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंतकुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 637</u> :– नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा नियंत्रणाखालील कोणत्याही बाजारात विक्रीकरीता माल मांडणाऱ्या व्यक्ती कडुन, बाजारपट्टी वसुल करण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका, अधिनियम 1949 कलम 332 अन्वये तरतुद आहे. नागपूर महानगरपालिकेच्या बाजार विभागा अंतर्गत येणाऱ्या 10 अधिकृत बाजारा मधुन, यापुर्वी रू. 2/– दराने बाजारपट्टी सन 2009 –10 पर्यंत वसुल करण्यात येत होती.

हॉकर्स नोंदणी सुरू करण्यात आल्यामुळे अधिकृत आठवडी व दैनिक बाजारातील बाजारपट्टी वसुली बंद करण्यात आली आहे. तसेच हॉकर्स नोंदणीचे काम बंद केलेले आहे. वरील वस्तुस्थिती विचारात घेवुन

शहराच्या विविध भागातील म.न.पा.च्या एकुण 10 अधिकृत बाजारात व्यवसाय करणाऱ्यांकडुन पुन्हा दैनिक व आठवडी बाजारपट्टी रू. 2/— ऐवजी या क्षेत्रात प्रशासकिय/व्यवसाय/सेवा शुल्क म्हणून रू. 10/— प्रमाणे घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन महासभेची मंजूरी करीता म.न.पा. सभागृहाकडे पाठविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 638</u> :— नागपूर महानगरपालिकेच्या बाजार विभागाव्दारे परवान्यावर देण्यात आलेल्या दुकान/जागा/ओटे चे वार्षीक परवाना शुल्कात नियमितता व एक सुत्रता आणण्यासाठी खालील प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन जुन्या वार्षिक परवाना शुल्कात व प्रस्तावित वार्षीक शुल्कात मोठया प्रमाणात तफावत आहे, असे कार्यालयास विचारणा केल्यावर आढळुन आले. करीता शुल्कातील नियमितता व एक सुत्रता राखण्याच्या दृष्टीने दरवाढीचा सुसहय प्रस्ताव विभागाने प्रस्तावित करुन स्थायी समितीकडे परत सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयाकडे परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

अ) सर्व दुकान/जागा/ओटे चे मासिक भाडे शासनाचे चालु वर्षाचे रेडिरेकनर दरानुसार निश्चित करणे. व जे दर येईल त्या रकमे नुसार 3 महिन्याचे मासिक भाडे डिपॉझीट म्हणून घेणे.

ब) मुळ परवानेधारकाच्या कुटुंबातील वारसदारांच्या नावे नांव परिवर्तन करतांना रेडिरेकनर दराने 3 महिन्याचे मासिक भाडे रक्कम परिवर्तन शुल्क व नामांतरण शुल्क रू. 1000/— म.न.पा. मध्ये जमा करावे लागेल. व मासिक भाडे शासनाचे चालु वर्षाचे रेडिरेकनर दरानुसार राहील.

क) मुळ परवानेधारकाच्या कुटुंबाशिवाय इतर व्यक्तींना व्यक्तीगत करार करून/पंजीबध्द भागीदारी करून प्रथम सहभागी करून घेतात. नंतर त्या भागीदारी व्यवसायातुन स्वतः मुक्त होवुन, ताबा हस्तांतरीत करून निघुन जातात अशा वेळी कब्जेधारकाचे नावाने परवाना परिवर्तीत करतांना, परवाना शुल्क नगर रचना व मुल्यांकन विभागाने ठरवुन दिलेल्या भाडे दरानुसार आकारण्यास, तसेच त्याच दरानुसार 3 महिन्याचा एकुण भाडे रक्कम एवढे परिवर्तन शुल्क रक्कम व नामांतरण शुल्क रू. 1000/— म.न.पा. मध्ये जमा करावे लागेल. परवानाच्या मुदतीनंतरही दुकान/ओटा/जागा याचा ताबा त्यांचे कडे राहिल्यास, चालु वर्षाच्या शासनाचे रेडिरेकनर दरानुसार जे मासिक भाडे निश्चित होईल त्यात 10 % वाढ अतिरीक्त समाविष्ट करून जे दर निश्चित होईल, त्या दरानुसार भाडे आकारण्यात येईल. तसेच महानगरपालिकेची पुर्व मंजुरी प्राप्त न करता मुळ परवानेधारका शिवाय अनधिकृत परवानेधारक/कब्जेधारक ज्या तारखेपासुन पाहणीत/निरिक्षणात दिसुन आल्यास, दुकान/ओटा/जागेच्या वार्षीक परवाना शुल्क शिवाय त्या तारखेपासुन प्रति महिना रू. 2000/— प्रमाणे दंडणीय शुल्क आकारण्यात येईल.

ड) म.न.पा.ला गाळा/जागा/ओट्याची गरज असल्यास एक महिन्याची नोटीस देवुन परत घेण्याचा अधिकार असेल. तसेच एक महिन्याची नोटीस देवुन गाळेधारकांस गाळा/जागा/ओटा परत करता येईल.

<u>ठराव क्रमांक 639</u> :— प्रभाग क्र. 58 — (अ), अंतर्गत चंद्रमणीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता मे. डी.सी. गुरूबक्षाणी कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 2.57 टक्के प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 48,77,258/— (अठ्ठेचाळीस लक्ष सत्त्यातर हजार दोनशे अठ्ठावन फक्त) राशीच्या सुधारीत प्राकलनास व निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 640</u> :— प्रभाग क्र. 52 धरमपेठ मातामंदिर रोड यादव भवन ते लक्ष्मीभुवन चौक रस्त्याचे पुर्नः डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदाकार मे. प्रेमचंद राचुमल यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 2.47 प्रतिशत ने अधिक रू. 26,66,554/— (सव्वीस लक्ष सासष्ठ हजार पाचशे चौपन फक्त) ची दराची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 641</u>** :– प्रभाग क्र. 20 अ आणि ब लष्करीबाग येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. के गुरूबक्षाणी यांची मूळे प्राकलनीय दरापेक्षा 22 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरापेक्षा 2.11 प्रतिशत ने अधिक दराची रू. 36,60,000/– (छत्तीस लक्ष साठ हजार फक्त) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम फीक्स प्रायरीटी अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. 30.00 लक्ष पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मे.के. गुरुबक्षानी ऐवजी मे. आर.एम. गोपलानी निविदाकाराच्या नावाची कार्यालयाने सुचविलेल्या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 642</u>** :– प्रभाग क्र. 8 (ब) मधील गोरवाडा घाटाचा विकास करण्याच्या कामास्तव रु. 48,89,109/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. A 23501130807 अंतर्गत तरतूद मुक्त करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 643</u>** :– सावित्रीबाई फुले महिला अधिकारी शिक्षण कार्यक्रम (UPSC/MPSC) प्रशिक्षणा अंतर्गत नागपूर महानगरपालिका हद्दीतील एक लाख रुपयांपेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबातील युवती किंवा महिलांना योजने अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येईल. या योजनेचा लाभ घेणाऱ्या इच्छुक महिला उमेदवारांना विहित नमुन्यामध्ये आवश्यक कागदपत्रांची (मार्कशिट, तहसीलदाराचा उत्पन्नाचा दाखला, नागपूर शहराचा रहिवाशी असल्याचा दाखला, शिधापत्रिका इलेक्ट्रीक बील,मतदान ओळखपत्र इ.)पूर्तता करुन अर्ज करावा लागेल. पात्रतेनुसार 200 अर्जाची निवड करण्यात येईल. 200 लाभार्थ्यांची चाचणी परीक्षा घेवून गुणवत्ता यादीप्रमाणे प्रथम येणाऱ्या 50 लाभार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ देण्यात येईल.

निवड चाचणी व प्रशिक्षणाकरिता कायदेशिर बाबींची पूर्तता करुन तत्सम प्रकारचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेची निवड करण्यात येईल. या योजनेकरिता 30 लक्ष रुपयाची तरतुद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली आहे.

या प्रशिक्षणाकरिता मा. शिक्षणाधिकारी यांनी शहराच्या मध्यभागी असणाऱ्या धंतोली झोनच्या जवळ धंतोली म.न.पा. मराठी उच्च प्राथमिक शाळेच्या इमारतीतील वर्ग खोल्या प्रस्तावित करण्यात आलेल्या आहेत. ज्या संस्थेची या कामाकरिता निवड करण्यात येईल, त्या संस्थेला या वर्गखोल्या प्रशिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात येतील, व त्या दोन खोल्यांचे विद्युत बिल तसेच दूरध्वनी देयक संबंधित संस्थेला अदा करावी लागेल.

या UPSC/MPSC प्रशिक्षणाकरिता दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देवून E.O.I मागवावी लागेल. ज्या संस्थेकडे UPSC/MPSC चे प्रशिक्षण देण्याचा अनुभव असेल, अशा संस्थेची निवड करुन त्या संस्थेच्या माध्यामातून UPSC/MPSC प्रशिक्षण सुरु करण्यात येईल. त्या अनुषंगाने महिला व बाल कल्याण समिती पद क्र. 274 मध्ये ठेवण्यात आलेल्या रु.30 लक्षाच्या खर्चाला मंजुरीस्तव तसेच दैनिक वृत्तपत्रात जाहिरात देवून स्वंयसेवी संस्थेकडून E.O.I मागविण्याकरिता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर केलेला प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 644</u>** :– प्रभाग क्र. 18 – ब, अंतर्गत कलकत्ता लाईन जवळ व बांगलादेश हनुमान मंदिर समोरील परीसर मराठा चौक, मराईमाता चौक बांगलादेश व खैरीपुरा येथे भुमीगत नालीचे कामाकरीता प्राप्त निम्नतम मे. अमोल पुप्पलवार यांची मुळे प्राकलनीय दरापेक्षा 2.50 प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 32,23,105/– (बत्तीस लक्ष तेवीस हजार एकशे पाच फक्त) राशीच्या असून सुधारीत प्राकलनासह व निम्नतम निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 645</u>** :– प्रभाग क्र. 72, क अंतर्गत महेश अपार्टमेन्ट रिंगरोड ते मिडल रिंग रोड, सुजाता लेआऊट येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. पी.के. कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 14.63 टक्के ने अधिक दराची व नविन सी. एस.आर. दरापेक्षा 2.22 टक्के ने अधिक दराची रू. 28,30,026/– (अठ्ठावीस लक्ष तीस हजार सव्वीस)

रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 646</u> :— प्रभाग क्र. 58 — अ, अंतर्गत अंतर्गत विश्वकर्मानगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता मे. डी.सी. गुरूबक्षाणी कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 2.57 टक्के प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 35,65,475/— (पस्तीस लक्ष पासष्ठ हजार चारशे पन्चात्तर फक्त) राशीच्या सुधारीत प्राकलनास व निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 647</u> :— प्रभाग क्र. 17,18मधील मेंहदीबाग रोड मस्कासाथ पुल ते खैरीपुरा रेल्वे क्रासींग रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे.पी.के. कन्स्ट्रशन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 19.25 टक्के अधिक व सुधारीत दरापेक्षा 2.83 प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 46,19,351/— (छेचाळीस लक्ष एकोणीस हजार तीनशे एक्कावन) ची निम्नतम निविदासह सुधारीत प्राकलनास स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 648</u> :— प्रभाग क्र. 12 अ ताजनगर कब्रस्तान फुलवारी शाळे पर्यंतच्या रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त 5 निविदा पैकी मे. ओ.जी. बजाज यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 18.65 प्रतिशत ने अधिक व नवीन CSR दरांपेक्षा 2.69 प्रतिशत ने अधिक दरांची रू. 29,66,250/— (एकोणतीस लक्ष सहासष्ठ हजार दोनशे पन्नास फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 649</u> :— प्रभाग क्र. 67 मानेवाडा दहनघाट येथे विकासाचे व सौदर्यकरणाचे कामाकरिता रु. 64,22,272/— ( चौसठ्ठ लक्ष बावीस हजार दोनशे बहातर ) रकमेच्या प्राकलनास पद क्र.A 23501130807( 2013-14) अंतर्गत प्रशासकीय मान्यतेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा करण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 650</u> :— प्रभाग क्र. 13 अ,पंचशील नगर व हाऊसींग बोर्ड कॉलोनी येथे रस्त्याचे डांबरीकरणाचे कामे करण्याकरिता रु. 49,86,090/— ( एकोणपन्नास लक्ष शहाऐंशी हजार नव्वद ) रकमेच्या प्राकलनास पद क्र.A 22001330802 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 651</u> :— प्रभाग क्र. 59 अ अंतर्गत रघुजीनगर व सोमवारी क्वॉर्टर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदाकार मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरांपेक्षा 17.20 टक्के अधिक दराची व नीवन सी.एस.आर दरापेक्षा 2.99 प्रतिशत ने अधिक दराची रू. 57,90,289/— (सत्तावन लक्ष नव्वद हजार दोनशे एकोणनव्वद फक्त) रकमेची सुधारित निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन या आर्थीक वर्षात कार्यादेश राशी रु.30.00 लक्ष पर्यंत सिमीत ठेवण्याचा सुचनेसह एकमताने मंजुरी प्रदान केली.

त्याप्रमाणे रु. 30.00 लक्ष पर्यत च्या कामाचे कार्यादेश दि. 09.01.2014 अन्वये निर्गमित करण्यात आलेले आहे.

मा. अध्यक्ष, स्थायी समिती, यांचे पत्र क्र. 944/टीआर/सीएससी/प्रोव्हीजन दिनांक 24.01.2014 अन्वये उर्वरित कामाकरिता रु.27,90,289/— चे तरतुद मुक्तीचे निर्देश प्राप्त आहे.

त्या प्रमाणे रु. 27,90,289/— च्या अतिरिक्त कार्यादेश देण्याबाबतचा व एकूण रु.57,90,289/— चा तरतुद मुक्तीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 652**</u> :— प्रभाग क्र. 58 — ब, अंतर्गत सिध्देश्वर सभागृह ते जादुमहल चौक CRIP पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता मे. पी.के. नगरारे कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 2.56 टक्के प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 46,62,714/— (छेचाळीस लक्ष बासष्ठ हजार सातशे चौदा फक्त) राशीच्या सुधारीत प्राकलनास व निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 653**</u> :— प्रभाग क्र.67 अ,गजाननगर व एकमत नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरिता मे. डी.सी.गुरुबक्षानी कन्स्ट्रशन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 3.00 टक्के प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 42,92,579/— (बेचाळीस लक्ष ब्यानऊ हजार पाचशे एकोणअंशी) राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 654**</u> :— प्रभाग क्र. 62 अ, अष्ठविनायक कॉलोनी, गजाननगर सुर्योदय नगर पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता मे. अर्मुता कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 18.12 टक्के प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 31,35,722/— ( एकतीस लक्ष पस्तीस हजार सातशे बावीस फक्त) राशीच्या सुधारीत प्राकलनास व निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 655**</u> :— प्रभाग क्र. 62 ब, जानकी नगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव मे. डी.सी. गुरूबक्षानी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 19.40 प्रतिशत ने अधिकची निविदा रू. 39,26,203/— (एकोणचाळीस लक्ष सव्वीस हजार दोनशे तिन फक्त) राशीच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 656**</u> :— प्रभाग क्र. 60 ब, आयुर्वेदिक ले आऊट, सिंधीबन ओलीयानगर, सोनझरी नगर, दत्तात्रयनगर येथील अंतर्गत रस्ते डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. 3937754/— चे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे तसेच पद क्र. A22001330802 ऐवजी A22001330803 हया दुरूस्तीसह तरतूद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 657**</u> :— प्रभाग क्र. 55 येथील लक्ष्मीनगर झोन अंतर्गत आय.आर.डी.पी. तसेच शहरातील रस्त्यावरील रोड, कट्स, पॉट होल दुरूस्ती करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 18.60 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरापेक्षा 2.11 टक्के ने अधिक दराची रू. 3556790 ( पसतीस लक्ष छप्पन हजार सातशे नव्वद फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, तसेच हे काम पद क्र. 342 (A2200140605) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रू. 3556790/— पर्यंत सिमीत ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रभाग क्र. 55 ऐवजी लक्ष्मीनगर झोन अंतर्गत या दुरुस्तीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>**ठराव क्रमांक 658**</u> :— प्रभाग क्र. 55 ब येथील विविध ठिकाणी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 2.49 टक्के अधिक दराची रु. 3588882/— (पसतीस लक्ष अठ्ठयांशी हजार ब्यांशी फक्त ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घऊन हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 3588882/— पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 659</u> :– प्रभाग क्र. 72 अ अंतर्गत सहकारनगर ब्रिजते एच. बी. ईस्टेट येथील रस्त्याचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. मुकेश कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 16.28 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर.दरापेक्षा 2.49 टक्के ने अधिक दराची रु. 4602579/– (छेचाळीस लक्ष दोन हजार पाचशे ऐकोणएंशी फक्त ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम पद क्र. 681 ( A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 4602579/– पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 660</u> :– प्रभाग क्र. 69 ब अंतर्गत स्नेह नगर, योगेक्षम लेआउट येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. ओ. जी. बजाज यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 15.75 टक्के अधिक दराची व नविन सी.एस.आर.दरापेक्षा 2.48 टक्के ने अधिक दराची रु. 5731824/– (सत्तावन लक्ष ऐकत्तीस हजार आठशे चोविस ) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न विचारात घेऊन तसेच हे काम फीक्स प्रायरीटी अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च रु. 4951900/– पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 661</u> :– प्रभाग क्र. 26 मध्ये विविध ठिकाणी कॉन्झरवंशी लाईन अंतर्गत गडर लाईनचे बांधकाम तसेच दुरूस्तीची कामे करण्यास्तव विभागाद्वारे तयार करण्यात आलेल्या रु. 4999545/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षांत पद क्र. A43901371913 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 662</u> :– प्रभाग क्र. 40 (अ व ब) मध्ये लाल इमली चौक ते धनराज यांचे घरापर्यंत सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू. 30,00,000/– रकमेच्या प्राकलनास जूने पद क्र. 682 ( Fix Priority) व नविन पद क्र. A22001330803 अंतर्गत प्रशासकीय मान्यता करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 663</u> :– प्रभाग क्र. 39 अ आणि ब इतवारी, कुंभारपुरा, गरूडखांब, हमालपुरा, कोष्टीपुरा, बुध्दुखां मीनार स्लम भागातील मुख्य रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव प्राप्त 4 निविदा पैकी मे. एल. सी. गुरूबक्षाणी यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 20.25 प्रतिशतने अधिक दराची व नविन सी.एस.आर. दरांपेक्षा 3.46 प्रतिशतने अधिक दरांची रू. 59,54,025/– ( एकोणसाठ लक्ष चौपन्न हजार पंचवीस फक्त) रकमेची सुधारीत निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 664</u> :– प्रभाग क्र.68 अंतर्गत येणाऱ्या विविध ठिकाणी (युको बॅंक ते बेलतरोडी रोड, सप्तगिरी पुल ते बेलतरोडी नाका, जयदुर्गा –6 ते वैशालीनगर, चिंचभुवन फ्लाय ओव्हर, मनिषनगर रेल्वे क्रॉसिंग जवळ 12.5 मी. हायमास्ट तसेच विविध ठिकाणी ) प्रकाश व्यवस्था करण्याकरिता रु 39,55,363/– च्या तुलनेत 7.1 टक्के कमी दराची रु.36,74,532/– ची मे. साधना इलेक्ट्रीकल वर्क्स यांची निम्नतम दराच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 665</u> :– हनुमान नगर झोन क्र.3, प्रभाग क्र.67 ब अंतर्गत मंगलदिप नगर नं. 2, अलंकार नगर ते श्रीकृष्ण नगर, कल्याणेश्वर नगर भागात प्रकाश व्यवस्था करणे व मंगलदिप नगर नं. 1 मैदान, सदगुरु नगर मैदान मुद्रा नगर मैदान, अभिजित नगर मैदान, विनकर कॉलनी मैदान या भागात 12.5 मी उंच हायमास्ट लावून प्रकाश व्यवस्था करण्याकरिता मे. सोनु इलेक्ट्रीकल्स यांची प्राकलनीय

दरापेक्षा 3 टक्के ने कमी असलेली रु 34,63,801/— ची निम्नतम निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 666</u>** :— सहकार नगर,भेंडे ले—आऊट,वर्धारोड, चिंचभुवन टि पॉईट, रघुजीनगर टि पॉईट, रामदेवबाबा टि पॉईंट, टि.बी.वार्ड चौक व मंगलमुर्ती चौक इत्यादी ठिकाणी स्वयंचलित वाहतुक नियंत्रक लावण्याकरिता रु 48,01,808/— च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 667</u>** :— प्रभाग क्र. 8 (ब) मधील गिट्टीखदान चौक ते दिनशॉ फॅक्टरी पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या रू. 47,24,331/— ( सत्तेचाळीस लक्ष चोविस हजार तीनशे एकतीस फक्त ) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे व या आर्थिक वर्षात पद क्र. A22001330802 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 668</u>** :— प्रभाग क्र. 31 व्यंकोबामुळे रोड ते पुखराज श्रीपाद सावजीगल्ली टाकळीकर ते गोजे, जुना भंडारा रोड ते चिंतेश्वर मंदीर चौक, मस्कासाथ चौक ते रेल्वे ओव्हरब्रिज, नंगापुतळा ते हल्दीराम हॉटेल पर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबतच्या कामाकरीता मे.एल.सी.गुरुबक्षाणी, यांची मुळ प्राकलनीय दरापेक्षा 2.48 प्रतिशत ने अधिकचे निविदा रू. 34,92,093/— ( चौतीस लक्ष ब्याण्णव हजार त्रयाण्णव ) राशीच्या सुधारीत प्राकलनास निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 669</u>** :— प्रभाग क्र. 18 (ब) मध्ये बांगलादेश पोलीस चौकी ते हनुमान मंदीर मैदान ते मराठा चौक ते खैरीपुरा येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव मे.पी.के.कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 18.50 प्रतिशत ने अधिकचे निविदा रू. 27,75,759/— ( सत्तावीस लक्ष पंचाहत्तर हजार सातशे एकोणसाठ ) राशीच्या सुधारीत प्राकलनासह निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 670</u>** :— प्रभाग क्र. 14 (अ व ब) पाठराबे वाडी येथे रस्त्याचे रुंदीकरण फुटपाथ व पंचवटीनगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्यास्तव मे.पी.के.कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 10.50 प्रतिशत ने अधिकचे निविदा रू. 33,10,029/— (तेतीस लक्ष दहा हजार एकोणवीस ) राशीच्या सुधारीत प्राकलनासह निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 671</u>** :— प्रभाग क्र. 45 मौजा—वाठोढा ख.क्र.65/1 व 65/2 वक्रदंत सोसायटी शक्तीमातानगर येथे रस्त्याचे रु.498529/— राशीचे डांबरीकरणाचे काम मनपाच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागामार्फत करण्याकरिता सन 2013—2014 या आर्थिक वर्षातील डीपीडीसी फण्डा अंतर्गत उपलब्ध असलेली राशी रु.498529/— मनपा हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाचे पद क्र. 795 ( अग्रिमव्दारे डांबर खरेदी ) अंतर्गत वळती करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक 672</u>** :— प्रभाग क्र. 45 मौजा—हरपुर सहकार नगर येथे रस्त्याचे रु.4,98,188/— राशीचे डांबरीकरणाचे काम मनपाच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागामार्फत करण्याकरिता सन 2013—2014 या आर्थिक वर्षातील डीपीडीसी फण्डा अंतर्गत उपलब्ध असलेली राशी रु.4,98,188/— मनपा हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाचे पद क्र. 795 ( अग्रिमव्दारे डांबर खरेदी ) अंतर्गत वळती करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 673</u> :— प्रभाग क्र. 68 ब अंतर्गत पायोनियर सोसायटी परीसरातील रस्त्याचे रु.1671150/— राशीचे डांबरीकरणाचे काम मनपाच्या हॉट मिक्स प्लॅन्टव्दारे करण्याच्या मंजुरीस्तव व तसेच सन 2013—2014 या आर्थिक वर्षातील पद क्र. 681 ( A2 200 1330 802) अंतर्गत उपलब्ध असलेली राशी रु. 1671150/— मनपाच्या हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाचे पद क्र. 795 ( A8 200 1490 601) ( अग्रिमव्दारे डांबर खरेदी ) अंतर्गत वळती करण्याच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन तसेच मागिल आर्थिक वर्षात ज्या रस्त्यांच्या विकास कामाला प्रशासकीय व वित्तीय मंजुरी स्थायी समिती कडुन मिळाली आहे. व अशी कामे नागपूर सुधार प्रन्यास च्या हॉटमिक्स प्लॉन्टद्वारे करण्याचे प्रशासनाने दिले होते अशी सर्व समकक्ष प्रकरणे मनपाच्या हॉट मिक्स प्लॉन्ट द्वारे करण्यास समितीने एकमताने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 674</u> :— शहरातील मालमत्तांच्या कर आकारणीच्या डाटा ची संगणकीय नोंद घेण्याच्या कामास्तव ई— निविदा मागविण्यात आला असता निविदेतील अटीव शर्ती प्रमाणे पात्र आढळलेल्या एकूण चार निविदांसंदर्भात खालील प्रस्तावाबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन,

1. या कामाकरीता प्राप्त निम्नतम दर रु. 12.76/— प्रति रेकार्ड यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. उपरोक्त दराप्रमाणे या कामावरील एकूण रु.36,74,038/— खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. निम्नत्तम निविदाकार M/s Aryansh Software Soutions Pvt.Ltd.Pune यांच्या सोबतच काम लवकर होण्याच्या दृष्टीने M/s Computech Services यांना काम विभागुन देण्यास व तुर्त M/s Computech Services यांना सतरंजीपुरा व धंतोली या दोन झोनचे रु. 6,00,000/— चे व तुर्त M/s Aryansh Software Soutions Pvt.Ltd.Pune यांना उर्वरीत आठ झोनचे रु.30,74,038/— चे काम वाटप करण्यास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. एजन्सीच्या कामाचे गुणवत्ता व कार्यक्षमता तपासुन काम निर्धारित वेळेत पुर्ण होण्याच्या दृष्टीने या कामवाटपात बदल करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 675</u> :— नागपूर शहरात 'कचरा घर मुक्त शहर' (Bin Free City) योजना राबविण्यासाठी स्थायी समिती ठराव क्रं. २०० दि. २४/१२/२००७ अन्वये में. कनक रिर्सोसेस मॅनेजमेंट लि. यांना सदरची योजना पूर्णपणे स्थापीत करण्यासाठी कामाची सुरुवात झाल्यापासुन प्रथम नऊ महिन्यांचा कालावधी (दिनांक १६/०५/२००८ पासुन दिनांक १५/०२/२०१४ पर्यंत) तसेच त्या पुढे उर्वरीत १० वर्षाच्या कालावधीसाठी प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. में. कनक रिर्सोसेस मॅनेजमेंट यांना दि. १८/०३/२०१३ रोजी देयकांच्या तपासणी सबंधी गोपनिय पत्र देण्यात आले आहे. सदर पत्रावर निर्णय होई पर्यंत कंत्राटदाराला दि. १६/०२/२०१४ पासून पुढील तिन महिन्या करीता Wholesale Price index (WPI) प्रमाणे मुदतवाढ देऊन सदर कामावर होणा—या अंदाजीत रु. ७ कोटी खर्चाला मान्यता प्रदान करुन खर्च आय—व्यय पद क्रं. 213/ B-41308 (A-24101231701) मधुन भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन विभागातर्फे संबंधीत कंत्राटदाराची चौकशी सुरु असल्यामुळे विभागाने चौकशीपुर्ण करुन आपल्या स्पष्ट अभिप्रायासहीत उपरोक्त प्रस्तावित विषय परत स्थायी समोर सादर करावा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 676** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर